ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53

वर्ष ३१ | पुणे, बुधवार ६ ऑक्टोबर, १९६५ | अंक १९

## विविध माहिती

**रशियन तज्ज्ञांचे आगमन**—उष्णतेवर वीज निर्माण करणाऱ्या संघटनेची उभारणी करण्यासाठी ५ रशियन तज्ज्ञ लवकरच भारतात येणार आहेत. मध्यवर्ती पाणी व वीज मंडळाला ते ह्यासंबंधी साह्य करणार आहेत. रशियाची ह्यासंबंधीची संघटना आणि पाणी व वीजपुरवठा खाते ह्यांच्या दरम्यान जरूर तो करार अलीकडेच करण्यात आला आहे. विद्युतनिर्मिती व पाणी-पुरवठा ह्या बाबतीत रशियाचा अनुभव विपुल आहे.

**विमानाचे सुटे भाग तयार करणार**—भारताच्या हवाई दलातील काही प्रकारच्या विमानांत काही परदेशी भाग वापरावे लागतात. पाश्चात्त्य देशांनी भारताला व पाकिस्तानला लष्करी मदत देण्याचे बंद केल्यामुळे ह्या परदेशी भागांची टंचाई होण्याचा संभव आहे. कानपूरमधील उद्योगपतींनी ही उणीव भरून काढण्याची तयारी दर्शविली आहे. जरूर ते सुटे भाग तयार करून लवकरच ते लष्करी तज्ज्ञांना पसंतीसाठी दाखविण्यात येतील.

**अंबाल्यामधील चर्चचे नुकसान**—भारत व पाक ह्यांच्यात झालेल्या सशस्त्र संघर्षात पाकिस्तानी विमानांनी अंबाल्यांतील सेंट पॉल्स कॅथिड्रलच्या इमारतीवर बॉंब टाकून तो उद्ध्वस्त केला. त्यामुळे ह्या जुन्या चर्चचे ५० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. ह्या चर्चमध्ये काही अप्रतिम तैलचित्रे होती. ती अर्थातच नष्ट झाली. चर्चचे अधिकारी इमारत पुन्हा बांधून काढण्यासाठी फंड गोळा करणार आहेत.

**कर्ज बुडविण्याचा उपाय**—कर्जबाजारी माणसे कर्ज देण्याचे टाळण्यासाठी अनेक बऱ्यावाईट युक्त्या योजीत असतात. ठाणे येथील एका तरुणाला १० हजार रुपयांचे कर्ज झाले होते व ते फेडण्यास तो असमर्थ होता. सावकारांना टाळण्यासाठी त्याने आपल्या प्रेयसीचा खून केल्याची वर्दी स्वतःच पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याला अटक केली व त्याने दिलेल्या वर्णनाच्या तरुणीचा तपास केला. पण, हा सर्व बनाव होता असे पोलिसांना आढळून आले.

**हिंदी संगीत कार्यक्रमाची प्रशंसा**—लिव्हरपूलमध्ये हिंदी संगीत कलाकारांचा एक कार्यक्रम करण्यात आला. सदर कार्यक्रमाची तेथील वृत्तपत्रांत खूप प्रशंसा करण्यात आली. कार्यक्रम कॉमनवेल्थ राष्ट्रगटाच्या कलासंघटनेतर्फे सादर करण्यात आला. त्यात सुप्रसिद्ध शहनाईपटु बिस्मिल्लाखान, रविशंकर, इत्यादी हिंदी कलावंतांनी भाग घेतला होता. सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक मि. येहुदी मेनुहिन ह्यांनी हिंदी कलाकारांचा परिचय करून दिला.

**देशातील बेकारांची नोंद**—भारतामधील उद्योगविनिमय केंद्रांतून गेल्या जूनअखेर नोंदलेल्या बेकारांची संख्या २५ लाख आहे. एंजिनिअर्स, डॉक्टर्स, नर्सेस, प्रशिक्षित शिक्षक, हिशेबनीस, वीजकामगार, लघुलेखक, दाया, इत्यादी कामे करणाऱ्या लोकांची मात्र टंचाई आहे. अकुशल कामगार, बिगर-प्रशिक्षित शिक्षक आणि कारकून ह्यांची संख्या विपुल आहे. काही प्रांतामधील बेकारांचे आकडे असे आहेत. पश्चिम बंगाल ४·७८ लाख, उत्तर प्रदेश ३·५४ लाख, महाराष्ट्र २·५८ लाख आणि मद्रास १·९४ लाख.

**छोट्या मोटारगाडीचे उत्पादन**—बंगलोर येथील हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट कारखान्याला मदत देऊन छोटी मोटारगाडी तयार करण्याचा कारखाना काढण्याचे प्रयत्न म्हैसूर सरकार करीत आहे. छोट्या मोटारींचा कारखाना काढून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यात आल्यास मोटारींची किंमत करासहित ७,५०० रुपयापर्यंत पडेल असा अंदाज आहे. म्हैसूर सरकारने कारखान्याची ३० कोटी रुपयांची योजना करून ती मध्यवर्ती सरकारकडे मंजुरीसाठी पाठविली आहे.

**ब्रिटनमधील भारतीयांची मदत**—ब्रिटनमध्ये असलेल्या हिंदच्या नागरिकांनी भारत–पाकिस्तान सशस्त्र संघर्ष सुरू झाल्यापासून राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी पैसे गोळा करण्याचे काम चालू केले आहे. विविध संघटनांमार्फत ७,२५० पौंडांची रक्कम जमविण्यात येऊन ती ब्रिटनमधील हिंदी हायकमिशनरच्या कचेरीत देण्यात येत आहे. अनेक हिंदी नागरिकांनी भारतात येऊन संरक्षण कार्यात भाग घेण्याची तयारी दाखविली आहे.

**लष्करी मोटारगाड्यांची मागणी**—भारताने जपानमधील कारखान्यांकडे लष्करी मोटारींची मोठी मागणी नोंदविली आहे. टोकिओमधील एका कारखान्याकडून भारताला २,२०० लष्करी मोटारी मिळणार आहेत. त्यासाठी ३३ लाख डॉलर्स किंमत द्यावी लागेल. जपानने भारताला येनचे जे पांचवे कर्ज दिले आहे त्यांतून मोटारींची किंमत चुकती करण्यात येणार आहे. भारताचे संरक्षण खाते जपानकडून अशा मोटारी ह्यापूर्वीही घेत आले आहे.

**मोटारींसाठी केरोसिनचे जळण**—मोटारींविषयी संशोधन करणाऱ्या जपानमधील एका संशोधन संस्थेने मोटारीच्या इंधनासाठी केरोसिनचा उपयोग करण्याची युक्ती शोधून काढली आहे. ह्या युक्तीचा उपयोग करून टोकिओत सध्या ६० टॅक्सी चालविण्यात येत आहेत. नव्या उपकरणाला ६५५ रुपये खर्च येतो. अनेक देशांकडून ह्या नव्या उपकरणाबद्दल विचारणा करण्यात येत आहे.

**मोठ्या शहरांचा पाणीपुरवठा**—न्यूयॉर्क शहराला पाणी पुरवणाऱ्या तळ्यातील पाण्याचा साठा येत्या फेब्रुवारीपर्यंत पाऊस पडून वाढला नाही तर ह्या शहराला पाणी मिळणार नाही. गेल्या शंभर वर्षांत शहरावर असा प्रसंग आलेला नाही. जगातील सर्व मोठ्या शहरांचे भवितव्यही पाण्याच्या टंचाईने कठीण होण्याचा संभव आहे.

**उत्तरासाठी रेडिओचा उपयोग**—मॅद्रिद शहरात घेण्यात येणाऱ्या एका परीक्षेत एका विद्यार्थ्याने रेडिओच्या साह्याने पुस्तकातून प्रश्नांची उत्तरे लिहिली. त्याच्याजवळ एक सूक्ष्म ध्वनिक्षेपक होता व कानांत एक सूक्ष्म उपकरण होते. त्याची एक मैत्रीण पुस्तके उघडून त्यांतील जरूर तो मजकूर त्याला ध्वनिक्षेपकावर सांगत होती.

**बंगालमध्ये मिठायांवर निर्बंध**—दुधातील केसीन ह्या घटकाचा वापर करून तयार करण्यांत येणारी मिठाई तयार करण्यास कलकत्त्याच्या म्युनिसिपल क्षेत्रांत बंदी घालण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. त्याची विक्रीहि करता येणार नाही. तथापि रसगुल्ला, चमचम, खिरमोहन व आणखी दोन प्रकारच्या मिठाया तयार करण्यास बंदी नाही. कलकत्त्यात दुधाची टंचाई पडल्यामुळे मिठायांच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणारे दूध कमी करण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे.

**पाकिस्तानला रशिआची यंत्रसामग्री**—पाकिस्तान व रशिया ह्यांच्या दरम्यान आर्थिक साह्याचा करार करण्यात आला आहे. करारात ठरल्याप्रमाणे रशिआ पाकिस्तानच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी १॥ कोटी रुपयांची यंत्रसामग्री उधारीने देणार आहे. पाकिस्तानात विमानतळ बांधण्यासाठी ह्या यंत्रसामग्रीचा उपयोग करण्यात यावयाचा आहे. येत्या तीनचार महिन्यांतच ती पाकिस्तानात येऊन पोहोचेल. रावळपिंडीजवळ खनिज तेल सांपडण्याचा संभव आहे. परंतु त्याचा शोध लावण्यासाठी लागणारी खोदकामाची यंत्रे पाकिस्तानजवळ नाहीत. तीहि पाकिस्तान रशिआकडून मिळविणार आहे.

**अविश्वासार्ह अधिकाऱ्यांची यादी**—हिंद सरकारच्या गृहखात्याने ज्या सरकारी नोकरांची वर्तणूक अविश्वासार्ह आहे अशा नोकरांची एक यादी तयार केली आहे. ह्या यादींत ३०० नोकरांचा समावेश असून त्यापैकी १०० नोकर वरिष्ठ दर्जाचे आहेत. ह्या नोकरांना महत्त्वाच्या जागांवर अगर ज्या जागांच्या अधिकारांमुळे लोकांना उपकृत करण्याची शक्यता आहे अशा जागांवर नेमण्यांत येणार नाही.

**कांच कारखान्याची विक्री**—आंध्र राज्यांतील गुडूर ह्या ठिकाणी काचसामान तयार करणारा सरकारी मालकीचा कारखाना १९४९ साली उभारण्यात आला आहे. गेली अनेक वर्षे ह्या कारखान्याला सतत तोटा सहन करावा लागत आहे. कारखान्यात ४·६४ कोटी रुपयांचे भांडवल गुंतलेले आहे. आतां हा कारखाना विकून टाकण्याची खटपट सरकार करीत आहे. राज्यातील खाजगी मालकीचा आणखी एक कारखाना बंद करण्यांत आलेला आहे.

**विश्वकिरणांविषयी अधिक माहिती**—गेल्या महिन्यात रशिआने १२·२ टन वजनाचा एक मोठा उपग्रह अंतराळात सोडला आहे. आतापर्यंतच्या सर्व उपग्रहांपेक्षा त्याचे वजन सर्वांत अधिक आहे. हा उपग्रह म्हणजे पृथ्वीभोवती फिरणारी एक प्रयोगशाळाच आहे. अत्यंत शक्तिमान म्हणून प्रसिद्ध असलेल्या विश्वकिरणासंबंधी उपग्रहातील उपकरणे महत्त्वाची माहिती पुरवीत आहेत.

**२० लाखांपेक्षा अधिक संपत्तीचे धनी**—एप्रिल, १९६४ ते जानेवारी, १९६५ ह्या काळात भारतामधील २३२ जणांवर संपत्तिकराची आकारणी करण्यांत आली. ह्या करपात्र लोकांची संपत्ति २० लाख रुपयांपेक्षाहि अधिक आढळून आली. ह्यांपैकी ३४ हिंदु अविभक्त कुटुंबे होती आणि १९९ व्यक्ति होत्या. त्यांच्यापैकी फक्त १४७ लोकांनी आकारण्यात आलेल्या सर्व कराचा भरणा केला.

**बसगाड्यांच्या सुट्या भागांचा कारखाना**—आंध्र राज्याच्या राज्य वाहतूक मंडळाने नागार्जुन फोंडा ह्या ठिकाणी बसगाड्यांना लागणाऱ्या सुट्या भागांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्याच्या उभारणीची योजना तयार केली आहे. मंडळाकडून आलेल्या योजनेचा राज्यसरकारकडून विचार चालू आहे. कारखाना उभारण्याच्या कामी परदेशीय तज्ज्ञांचे सहकार्य मिळविण्यात येणार आहे. कारखाना एका स्वतंत्र औद्योगिक वसाहतीच्या रूपात उभारण्यात यावयाचा आहे.

**युद्धाची जोखीम नको**—ब्रिटनचे माजी परराष्ट्रीय मंत्री मि. गॉर्डन वॉकर ह्यांनी असे मत व्यक्त केले होते की, चीनला आपल्या सरहद्दीवर युद्ध नको आहे. अमेरिका युद्धातील नेहमीच्या शस्त्रास्त्रांचा उपयोग करून आपली अणुशस्त्रांची ठाणी उध्वस्त करील अशी भीती चीनला वाटत आहे. शिवाय अमेरिका ही फार मोठी अण्वस्त्र धारण करणारी शक्ती आहे ह्याचीही जाणीव चीनला आहे.

एक चटई
अकरा मापे तेल
पाच जेवणे.....

एवढ्या "किमतीत" एक बैल विकला असं एका जुन्या इजिप्शिअन चित्रावरून दिसतं. पैशाचा शोध लागण्याआधी बार्टर (वस्तुचे चलन) व्यवहार होत असे. आता त्यांपवजी बहुतेक ठिकाणी पैशाचे चलन आणि त्याबरोबर बँका आहेत. बार्टर काळातील माणसामाणसांधील पूर्ण विश्वासाप्रमाणे बेळगाव बँक विश्वसनीय आहे.

शेड्यूल्ड बँक | **दि बेळगांव बँक लिमिटेड** | स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.
सर्व प्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मुंबई ९

१

# अर्थ

बुधवार, ६ ऑक्टोबर, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानची आर्थिक शक्ती भारतापेक्षा कमी

पाकिस्तान आणि भारत ह्यांच्यामधील संग्राम सुरू झाल्यावर उभयता देशांच्या आर्थिक शक्तीकडे साहजिकच लक्ष वेधले जाऊ लागले. कारण, लढा लांबल्यास तो स्वतःच्या शक्तीवर चालविणे उभयता देशांना भाग पडणार होते. ह्या विषयाचा विचार करताना एक गोष्ट महत्त्वाची ठरते. पाकिस्तानच्या मानाने भारताचे आर्थिक सामर्थ्य अधिक तर आहेच; परंतु त्याचा विकासही विविध अंगांनी झालेला आहे. औद्योगिक परिभाषेत बोलावयाचे तर भारतामधील उद्योगधंदे विविधतेवर आधारलेले आहेत. त्यामुळे भारताला युद्धप्रयत्नाच्या बाबतीत परदेशातून होणाऱ्या आयातीवर कमी प्रमाणात अवलंबून राहावे लागते. अर्थातच भारताची आर्थिक शक्ती दुबळी पडण्याचा संभव पाकिस्तानच्या मानाने कमी आहे. आर्थिक शक्तीचे लष्करी सामर्थ्यात रूपांतर करण्याच्या दृष्टीने भारताची औद्योगिक प्रगती बरीच वरच्या पातळीची आहे. भारत हा देश पाकिस्तानच्या मानाने मोठा तर आहेच, पण त्याचा औद्योगिक पायाही चांगला मजबूत घालण्यात आला आहे. त्यामुळे लष्करी उपयोगाचा माल तयार करण्याचा भारताचा मगदूर पाकिस्तानपेक्षा खूपच अधिक आहे. काम करू शकणाऱ्या भारताच्या लोकसंख्येपैकी १० टक्के लोक उद्योगधंद्यात गुंतलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नापैकी १९ टक्के उत्पन्न भारताला उद्योगधंद्याकडून मिळते. पाकिस्तानचे हेच आकडे अनुक्रमे ८ टक्के व १० टक्के असे आहेत. भारतांत आधुनिक तऱ्हेच्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या सुमारे ४० लाख आहे; तर पाकिस्तानात ती ६ लाख आहे. पाकिस्तानांत कापडाच्या व तागाच्या गिरण्यांचा धंदा विकास पावलेला आहे. आधुनिक रसायने आणि यंत्रसामग्री ह्यांच्या उत्पादनाच्या बाबतीत पाकिस्तान मागासलेला आहे. तेथील कारखान्यांत पोलादाचे व इतर धातूंचे मोठे कारखाने नाहीत.

उलटपक्षी, भारताने आर्थिक विकासाचा एक कार्यक्रम म्हणून वरील उद्योगधंद्यांना बरेच प्राधान्य दिलेले आहे. पाकिस्तानशी तुलना करता भारत ४० पट अधिक सल्फ्युरिक ॲसिड, २० पट अधिक खते आणि १० ते १५ पट अधिक कॉस्टिक सोडा व सोडा ॲश निर्माण करतो. भारत जवळ जवळ ९० लाख टन पोलादाचे ठोकळे निर्माण करू शकेल. पाकिस्तानची निर्मिती अगदीच बेताची आहे. भारतात औद्योगिक यंत्रसामग्री, यांत्रिक हत्यारे, प्रवासी व मालवाहतुकीच्या मोटारी, रेल्वे एंजिने व डबे, त्याचप्रमाणे विजेची उपकरणेही तयार होतात. पाकिस्तानात साध्या प्रकारची काही यंत्रसामग्री उत्पन्न होऊं शकते. एकंदरीने यंत्रसामग्री, धातू आणि रसायने ह्यांच्या बाबतीत पाकिस्तान भारतापेक्षा बऱ्याच अधिक प्रमाणात परदेशांतून होणाऱ्या आयातीवर अवलंबून आहे. आपल्या सर्व आयातीच्या गरजा भागविण्याइतकी निर्यात दोघेही करीत नाहीत. मात्र आयातनिर्यातीमधील पाकिस्तानची तफावत भारतापेक्षा अधिक मोठी आहे. १९६४ साली पाकिस्तानने ४७५ कोटी रुपयांचा माल व तदनुषंगिक सोयी परदेशातून आयात केल्या. पण निर्यात मात्र २०० कोटी रुपये किंमतीच्या मालाचीच होऊ शकली. ह्याचाच अर्थ असा की पाकिस्तानच्या आयातीपैकी अर्ध्यापेक्षा अधिक आयात परदेशाकडून मिळणाऱ्या मदत-फंडातून करण्यात आली. उलटपक्षी भारताने आपल्या आयातीच्या गरजांपैकी ६५ टक्के गरजा निर्यात करून मिळविलेल्या परदेशीय चलनातून भागविल्या. आता भारताला व पाकिस्तानला परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीत कपात करण्यात येणार आहे, असे म्हणतात. अशी कपात करण्यात आली तर भारताच्या अर्थव्यवस्थेत फारसा गोंधळ उडणार नाही. पाकिस्तानची अर्थव्यवस्था मात्र त्या मानाने अधिक विस्कळित होईल.

---

## पाकिस्तानची तयारी आठ महिन्यापासून चालू होती

भारत–पाक संघर्षाची तयारी पाकिस्तान ८ महिन्यांपूर्वीपासूनच करू लागला होता, असा पुरावा भारतीय लष्कराच्या चढाईमुळे उपलब्ध झाला आहे. सियालकोट भागात भारतीय लष्कर घुसले तेव्हा आंतरराष्ट्रीय सरहद्दीपासून १० मैल आत असलेल्या कित्येक खेड्यांतून भूमिगत पक्की भुयारे बांधण्यात आल्याचे दिसून आले. ह्या भुयारांचे बांधकाम एवढे पक्के व मजबूत होते की ती चारदोन आठवड्यात बांधता येणे अशक्यच होते. वरून साध्या दिसणाऱ्या रहात्या घरांच्या खालीच ती बांधण्यात आलेली होती. जरूरच पडली असता आणि भारतीय लष्कराने मुसंडी मारलीच तर त्याला उपद्रव देण्यासाठी भुयाराचा चांगला उपयोग करता आला असता. पाकिस्तानमधील एका खेड्यातील नागरिकाने प्रथम ही माहिती भारतीय लष्कराला दिली. प्रे. अयुबखान ह्यांची अध्यक्ष म्हणून निवडणूक जानेवारीत झाली व मार्चपासून तो अधिकारावर आला. तेव्हापासून युद्धाची तयारी चालू झाली.

---

## पाकिस्तान चीनच्या हातांतील बाहुले बनले !

भारत व पाकिस्तान ह्यांच्यातील लष्करी संघर्षाला, चीनने भारताला दिलेल्या निर्वाणीच्या इशाऱ्यामुळे निराळीच कलाटणी मिळाली. चीनच्या हस्तक्षेपामुळे बड्या राष्ट्रांच्या भूमिकात बदल होण्याची शक्यता वाढली. बड्यातीलही बडे दादा म्हणजे अमेरिका व रशिया. भारत–पाक संघर्षासंबंधी त्यांच्या भूमिका तपासिल्याच्या दृष्टीने वेगळ्या असल्या तरी हा संघर्ष लवकरात लवकर मिटविण्याच्या बाबतीत त्यांचे मतैक्य आहे आणि ते सुरक्षा समितीने केलेल्या ठरावाच्या वेळी दिसून आले. चीनने भारताबाबत जी आक्रमक भूमिका घेतली आहे त्याच्या हेतूबद्दल नाना प्रकारचे तर्क करण्यात आले आहेत. पाकिस्तान आणि चीन ह्यांची पावले काही एका आगाऊ योजनेप्रमाणे पडत आहेत असे भारताचे पंतप्रधान श्री. शास्त्री ह्यांनी लोकसभेतील आपल्या निवेदनात सांगितले, पण काही निरीक्षकांच्या मताने ह्यात संपूर्ण सत्य नाही. त्यांच्या मताने पाकिस्तान आता चीनच्या हातातील बाहुलेच बनला आहे. काश्मीरमधील राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याच्या कामी पाश्चिमात्य देशांचाच अधिक उपयोग होईल,

अशी अध्यक्ष आयुबखान ह्यांची परवापर्यंत धारणा होती. नेमक्या ह्याच वेळी चीनने लष्करी हस्तक्षेप करून पाकिस्तान पुढे नवे प्रलोभन ठेवले आहे. अध्यक्ष अयूबखान ह्यांनी अमेरिकेच्या अध्यक्षांना मध्यस्थी करण्याबद्दल सुचविले होते. अशा वेळी चीन गप्प बसला असता तर पाकिस्तान परत अमेरिकेच्या कच्छपी लागण्याचा संभव होता. ही घटना घडून न यावी म्हणून चीनने लष्करी कारवाई सुरू केली असावी. इतकेही करून युद्धबंदी झालीच तर ती अमेरिका, रशिया अगर संयुक्त राष्ट्रसंघ ह्यांच्यामुळे न होता आपल्या प्रभावामुळे झाली असा दावा सांगण्यासही चीन मागेपुढे पाहणार नाही.

---

### इंडोनेशिआकडून पाकिस्तानला विमाने मिळाली ?

इंडोनेशिआने पाकिस्तानला काही लष्करी विमाने देण्याचे कबूल करून ती पूर्व पाकिस्तानात पाठवूनही दिली अशी वार्ता आहे. ही विमाने कोणत्या प्रकारची आहेत व किती आहेत ह्याबद्दल मात्र सुगावा लागलेला नाही. इंडोनेशिआने पाकिस्तानला मदत करण्याची तयारी दाखविलेली होती. सीलोनने इंडोनेशिआच्या विमानांना आपल्या तळावर उतरू देण्यास मनाई केली होती. इंडोनेशिआतून सरळ पूर्व पाकिस्तानला विमाने नेता येतील की नाही ह्याविषयी शंका व्यक्त करण्यात येत होती. परंतु तज्ज्ञांच्या मताने सुमात्रा बेटाच्या वायव्येकडील विमानतळावरून भरपूर तेल भरून घेऊन उड्डाण केल्यास विमाने पूर्व पाकिस्तानात जाऊ शकतील. पाकिस्तानला काही रणगाडाविरोधी तोफाही मिळाल्या असल्याची वंदता आहे.

---

### संरक्षणसामर्थ्य वाढविण्याचे आटोकाट प्रयत्न

भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत उद्भवलेल्या लष्करी झटापटी आटोपल्या असल्या तरी भारताने आपले संरक्षणसामर्थ्य वाढविण्याचेच ठरविले आहे. भारताचे उद्योगमंत्री श्री. टी. एन्. सिंग ह्यांनी लोकसभेच्या अनौपचारिक सल्लागार समितीपुढे भाषण करताना ही गोष्ट स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की भारताचे उद्योगखाते संरक्षणाच्या अनेकविध गरजा भागविण्याला अग्रहक्क देत आहे. देशाचे संरक्षणसामर्थ्य वाढीला लागावे आणि तेही दीर्घकालीन गरजा लक्षात घेऊन, असा सरकारचा हेतू आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमात ट्रॅक्टर्सचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविण्याचाही सरकारचा उद्देश आहे. त्याचप्रमाणे शेतीच्या इतर अवजारांचेही उत्पादन वाढविण्याचे जोराचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. कारण चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यक्रमांत शेतीला प्राधान्य देण्याचे धोरण चालू ठेवण्यात येणार आहे. ट्रॅक्टर्स तयार करण्याची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी नव्या कारखान्यांना परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचे उत्पादन दुपटीने वाढेल असा अंदाज आहे. त्याशिवाय यांत्रिक साह्याने नांगरणी करणारी अवजारे तयार करण्यासाठी दोन कारखान्यांना परवाने दिलेले आहेत. आणखी काही कारखान्यांचे अर्ज आले असून त्यांचा विचार चालू आहे. भारतामधील कारखान्यांनी आपली मदार सर्वस्वी आयातीवर ठेवू नये. ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी देशी बनावटीचा माल वापरून कारखाने स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. समितीच्या काही सभासदांनी शेतीचे यांत्रिकीकरण वाढविण्यासंबंधी आणि संरक्षण-सामग्रीच्या उत्पादनाच्या बाबतीत छोट्या उद्योगधंद्यांचे साह्य घेण्याच्या सूचना केल्या. त्याचप्रमाणे आयातीवर अवलंबून न राहण्याच्या कार्यक्रमाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी असेही सुचविले.


## दि सारस्वत को. बँक लि., मुंबई

" सारस्वत बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलात ३१·०१ लक्ष रुपयांची भर पडून आता ते रु. ४८१·१७ लक्ष झाले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ठेवी रु. २९ लक्षांनी वाढल्या. ह्या नागरी बँकेने सर्वसाधारण मनुष्याच्या बचतीचा संचय करण्याचे कार्य किती मोठ्या प्रमाणात केले आणि त्यायोगे बँकिंग क्षेत्राशी त्याला निगडित करण्याचे जे कार्य केले ते वरील आकड्यावरून सहज कळेल. बँकेचे तरते भांडवल ७१ टक्के आहे आणि कर्जाचे ठेवीशी प्रमाण फक्त ३४ टक्के आहे. बँकेने सारस्वत ज्ञातीपुरतीच एक लहानशी पतपेढी म्हणून आपल्या कार्याला प्रारंभ केला, आणि आता ती एक आदर्श नागरी सेव्हिंग बँक म्हणून कार्य करीत आहे. बँकेकडे ज्या प्रमाणांत ठेवीचे प्रमाण वाढले त्या प्रमाणात बँकेने कर्जे देण्याविषयी आपले धोरण व्यापक केले आणि आता ती ज्ञाती-निरपेक्षतेने सर्वसाधारण मनुष्याच्या कर्जविषयक विविध गरजा भागवीत आहे. बँकेकडून ज्यांना कर्जे दिली जातात अशामध्ये लहान उत्पादक, व्यापारी, श्रमजीवी, धंदे व्यवसाय करणारे लोक, या सर्वांचा अंतर्भाव होतो. बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा फायदा घेऊन पुष्कळजणांनी आपला व्यापार वाढविला आहे आणि कित्येक छोटी छोटी उत्पादन केंद्रेही निर्माण झाली आहेत. बँकेने दिलेल्या कर्जावर बँकेला किती व्याज मिळेल यापेक्षा कर्जदाराची खरी गरज काय आहे आणि तो दिलेल्या कर्जाचा विनियोग किती चांगल्या प्रकारें करू शकेल ते व्यवस्थापक मंडळ पहात असते. बँकेच्या व्यवहारातून जी शिल्लक रहाते त्याची गुंतवणूक महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेकडे अल्प आणि मध्यम मुदतीच्या ठेवीमध्ये करण्यात येते. त्याचप्रमाणे केन्द्र सरकार आणि राज्य सरकार यांनी विक्रीस काढलेल्या कर्जरोख्यात व शेती आणि औद्योगिक वृद्धीसाठी कार्य करीत असलेल्या सहकारी क्षेत्रातील संस्थांच्या रोख्यामध्ये ही आपली शिल्लक गुंतवून त्यांच्या कार्यास भरीव हातभार लावते. त्याचे श्रेय बँकेचे ठेवीदार आणि भागधार ह्यांसच दिले पाहिजे. " असे बँकेचे चेअरमन, श्री. वा. पुं. वर्दे हे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले.

वृत्तांताच्या वर्षी बँकेचा निव्वळ नफा रु. १·८९ लक्ष इतका होता. मागील वर्षी तो रु. १·६९ लक्ष होता. म्हणजे या वर्षी निव्वळ नफ्यांत रु. २० हजारची वाढ झाली. १०,२२,६९० रु. वसूल भांडवलावर ७% डिव्हिडंड देण्यासाठी ७०,५०० रु. चा विनियोग केला जाईल. बँकेचे रिझर्व्हज् १५·५५ लक्ष रु., म्हणजे वसूल भांडवलापेक्षा ५·३३ लक्ष रु. नी जास्त आहेत. बँकेकडील ठेवींच्या ३५,६४२ खात्यांपैकी ७९% म्हणजे २८,०१९ खाती १,००० रु. पेक्षा कमी ठेवीची आहेत, त्यावरून अर्बन सहकारी बँकांना लहान असामींच्या बचती एकत्र आणण्याकडे केवढी मोठी कामगिरी करता येते, ते दिसून येईल.

[ चेअरमन : श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम., एफ. आय. बी., सेक्रेटरी : श्री. एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम ]


---

## "अर्था"चा दिवाळी अंक

**( २० ऑक्टोबर १९६५ )**

"अर्था"चा येता अंक हा दिवाळीचा मोठा अंक असून तो दिवाळीपूर्वी प्रसिद्ध होईल.

त्यानंतरचा ३ नोव्हेंबरचा अंक नेहमीप्रमाणे बंद राहील.

## नान्देड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ३०-६-६५ असेर संपणाऱ्या ४२ व्या वर्षाची प्रगती उल्लेखनीय आहे. बँकेने हाताळलेल्या शेती भांडवल पुरवठा व बँकिंगच्या सर्व प्रकारच्या व्यवहारामध्ये वाढ झालेली निदर्शनास येईल.

अहवालाचे वर्षात बँकेचे भाग भांडवलात रु. ७ लाख ३६ हजाराने वाढ झाली आहे. सर्व प्रकारच्या ठेवींत रु. ६१ लाख ५८ हजाराने वाढ झाली आहे. सोसायट्यांच्या ठेवींपेक्षा वैयक्तिक ठेवी रु. ५९ लाख ८४ हजाराने अधिक आहेत. ही संतोषकारक वाढ म्हणजे बँकेने जनतेचा संपादन केलेला दृढ विश्वास व तत्पर चोख सेवेचे प्रशस्तिपत्र होय. शेती कर्ज वाटप रु. १९८ लाख ६० हजार केले असून गेल्या वर्षापेक्षा रु. ४८ लाख ६९ हजाराने हे वाटप यंदा जास्त केले आहे. त्याचप्रमाणे मध्यम मुदत कर्जात गेल्या वर्षापेक्षा रु. २ लाख १६ हजार वाढ झाली आहे. बिगर शेती व्यवहारात गेल्या वर्षापेक्षा रु. ८८ लाख ०५ हजाराने उलाढाल जास्त झाली आहे.

बँकेचे खेळते भांडवल रु. ३ कोटी, ८२ लाख, ४२ हजार आहे. बँकेची सांपत्तिक परिस्थिती मजबूत करण्याचे दृष्टीने गेल्या वर्षापेक्षा गुंतवणुकीत रु. २२ लाख १० हजाराने वाढ केली असून गंगाजळीत चांगलीच भर पडली आहे. बँकेचे ताळेबंदातील निर्देशित आकड्यावरून बँकेच्या आर्थिक स्थैर्याची माहिती होईल.

| | | (आकडे लाखात) |
|---|---|---|
| १. वसूल भाग भांडवल | | रु. ४८·०१ |
| २. रिझर्व्ह फंड व अन्य निधी | | रु. ५·९० |
| ३. पतपेढ्यांच्या ठेवी रु. | ५०·५० | |
| ४. वैयक्तिक ठेवी रु. | ११०·३४ | |
| | | रु. १६०·८४ |
| ५. गुंतवणूक | | रु. ४७·४६ |
| ६. शेती कर्ज | २५६·३७ | |
| ७. बिगर शेती कर्ज | २५·३६ | |
| | | रु. २८१·७३ |

जिल्ह्यातील ग्रामीण औद्योगिक विकासाकरिता बँकेने "सहकार उद्योग मंडळ" स्थापन केले असून या मंडळातर्फे जिल्ह्यातील शेती उत्पादित व अन्य कच्च्या मालापासून पूरक असे छोटे छोटे धंदे कोणते काढता येतील हे पाहून ते कार्यान्वित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. उदा.: टॅनिंग, ह्यूम पाईप, सुकेळी, सरकीपासून तेल, लिंट, मिरची पावडर, विटा तयार करणे, फळांचा रस इत्यादी. त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या निरनिराळ्या ठिकाणी औद्योगिक प्रकल्पाची उभारणी व्हावी म्हणून सर्वांगीण प्रयत्न चालविले आहेत. कलंबर (ता. कंधार) व मांजरम (ता. बिलोली) येथे साखर कारखाना, कुंडलवाडी (ता. बिलोली), जांब (ता. मुखेड), येथे तेल गिरणी, लोहा (ता. कंधार), उमरी (ता. भोकर), करडखेड (ता. देगलूर), नायगाव (ता. बिलोली), नांदेड व मुखेड या तालुक्याचे ठिकाणी जिनिंग प्रेसिंगचे काम सुरू व्हावे असे प्रयत्न चालू आहेत. यापैकी उमरी येथील जिनिंग प्रेसिंग व कुंडलवाडी येथील तेल गिरणीचे उत्पादन कार्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. नांदेड येथे १२,००० चात्यांची भव्य सहकारी सूत गिरणी सुरु होणार असून तिचे इमारत कामास सुरुवात झाली असून यंत्रसामग्रीही येऊ लागली आहे. ही योजना रु. ८० लाखांची आहे.

बँकेचे वाढत्या व्यापामुळे बँकेने अहवालाचे साली मालकीच्या जुन्या दुमजली इमारती शेजारी नवीन दोन मजली सुंदर इमारत बांधली आहे व लवकरच आणखी एका नव्या इमारतीचे काम हाती घेतले आहे. बँकेचे इमारतीचे मागे तपासणी अधिकारी व भेट देणारे सन्माननीय पाहुणे यांचे सोयीसाठी सुसज्ज असे "अभ्यागतगृह" बांधले आहे.

बँकेचे चेअरमन श्री. शामराव कदम हे एक निष्ठावंत सहकारी कार्यकर्ते आहेत व संचालक मंडळाचे सदस्यांची त्यांना चांगली साथ आहे. सहकारी औद्योगीकरणाप्रमाणेच समाजाचे खालच्या थरातील गरीब शेतकरी, शेतमजूर यांच्या आर्थिक उन्नतीकरिता बँकेस काय करता येईल याविषयी योजना तयार करण्याचे काम बँकेने हाती घेतले आहे.

गेल्या वर्षी रु. १·२६ लाख नफा बँकेस झाला होता. अहवालाचे साली रु. २·५५ लाख नफा बँकेस झाला आहे.

---

## पंचगंगा व कृष्णा सहकारी साखर कारखान्यांची विस्तारयोजना

## प्रत्येकी दैनिक २६०० टन ऊस गाळपशक्तीचा परवाना.

श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर—इचलकरंजी व कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., रेठरे बुद्रुक (कऱ्हाड) या कारखान्यांची सध्याची दैनिक ऊसगाळपशक्ती १००० ते १२५० टनांची होती. या गाळपशक्तीमध्ये विस्तृत प्रमाणावर वाढ करून, दैनिक २६०० टन उसाचे गाळप करण्यासाठी भारत सरकारच्या अन्न व कृषिमंत्रालयाच्या शिफारशीनुसार केंद्रीय उद्योगमंत्रालयाकडून रीतसर परवाने देण्यात आले आहेत. मर्यादित गाळपशक्तीमुळे कारखान्यांना जादा उसाचे गाळप करणे अवघड होऊन राहिले होते व परिणामी अनेक ऊसकऱ्यांची कुचंबणा होत होती.

श्री. पंचगंगा साखर कारखान्याचे चेअरमन आमदार दे. म. रत्नाप्पा कुंभार, कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. जयवंतराव भोसले व त्या त्या कारखान्याचे संचालक मंडळ यांचे गाळपशक्तीमध्ये वाढ करून मिळवण्याचे प्रयत्न असेर फलद्रूप झाले आहेत. वाढलेली गाळपशक्ती प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी प्रत्येक कारखान्याला सुमारे पावणेदोन कोटी रुपये खर्च येणार असून, त्यासंबंधी पुढील व्यवस्था कारखान्यांच्या संचालक मंडळांनी आयोजित केली आहे.

---

## कॉसमॉस बँकेचे नवे पदाधिकारी

सल्लागार मंडळ—(१) श्री प्रो. वा. रा. होनप, अध्यक्ष (२) श्री डॉ. न. का. घारपुरे, उपाध्यक्ष (३) श्री. गं. मो. भणगे (४) श्री रा. द. भट (५) श्री वि. ल. हर्डीकर.

कार्यकारी मंडळ—(१) श्री द. ग. देव, कार्याध्यक्ष (२) श्री ह. गो. महाजन, उपकार्याध्यक्ष (३) मु. मा. कुलकर्णी (४) श्री अ. बा. देहाडराय (५) सौ. आशा वि. हर्डीकर (६) श्री म. ग. सांडेकर (७) श्री द. मो. पाटसकर (८) श्री का. रा. कापरे (९) श्री स. स. देशपांडे (१०) श्री म. म. राडकर (११) श्री म. ना. परांजपे.

स्थानिक आयव्यय निरीक्षक—(१) श्री के. शं. कुलकर्णी (२) श्री म. ज. पेठे.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

**सारस्वत**

**को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... रु. | १०·२२ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... रु. | १५·७८ ,, |
| ठेवी | ... रु. | ४४३·६२ ,, |
| खेळतें भांडवल | ... रु. | ४८१·१५ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

**कण आणि क्षण**

लेखक:—श्री. वा. काळे

**तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली !**

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणे २.

**स्वस्तिकचा माल निर्यात होऊ लागला**

—: काही बोलके आकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालातील मालाची विक्री | रु. १ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३, ८१, ४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचे क्षेत्रफळ | १,१०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादने —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

**स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.**

स्वस्तिक गृह, खडकी, पुणे ३.

( टेलिफोन नं. : ५५२०१ )

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

" चिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा—शहर

*दि. १८-२-६५ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

**मुदतीच्या ठेवी**

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते :—दि. १-२-६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४-७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४ २५४७८१ | फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर ( १० ) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

ह्या बँकेत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | ५,३०,५१,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,५६,७१,००० |
| ठेवी | ... | ३९,१४ ३२,००० |
| खेळते भांडवल | ... | ९१,४८,३५,००० |

भारतांतील प्रमुख शहरी हुंड्या, बिले वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

डॉ. वा. शु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.


### नर्मदा नदीच्या खोऱ्याच्या विकासाची योजना

नर्मदा नदीच्या खोऱ्याचा विकास करून पाणीपुरवठा आणि वीज–उत्पादन करण्याच्या योजनेचा विचार करण्यासाठी एक वर्षापूर्वी खोसला कमिटी नेमण्यात आली होती. ह्या कमिटीने आपले काम पूर्ण केले असून विकासाची एक भव्य योजना आखली आहे. ह्या योजनेशी महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि गुजरात ह्या राज्यांचा संबंध येतो. त्यामुळे सर्वच राज्यांचे हितसंबंध त्यात गुंतलेले आहेत. योजनेची अंमलबजावणी करतांना प्रादेशिक अगर राज्यांच्या हितसंबंधावर भर देण्यापेक्षा राष्ट्रीय हितसंबंधात प्राधान्य यावे असे सुचविण्यात आले आहे. पश्चिम राजस्थानातील बराच मोठा भाग पावसाच्या अभावी नापिकी आहे. ह्या भागातील बारमेर आणि जालोर विभागाला आणि कच्छच्या रणालाही पाणीपुरवठा करण्याची सोय ह्या योजनेमुळे होईल. नवगाव येथे धरण बांधण्यात येऊन विद्युतनिर्मिती करण्याचे केंद्र उभारण्यात यावे अशी शिफारस कमिटीने केली आहे. नवगावपासून काढण्यात येणाऱ्या कालव्यावरही एक विद्युत केंद्र काढण्याची सूचना करण्यात आली आहे. योजनेतील कामांची जबाबदारी तीनही संबंधित राज्यांवर असली तरी प्रत्यक्ष काम गुजरात सरकारच्या नियंत्रणाखाली चालावे असेही सुचविण्यात आले आहे.

---

### कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., रेठरे बुद्रुक
### पो. शिवनगर


मंगळवार दिनांक ५–१०–६५ रोजी सकाळी ८–४५ वाजता विजयादशमीच्या सुमुहूर्तावर सन १९६५–६६ च्या हंगामाप्रीत्यर्थ बॉयलर प्रदीपन समारंभ सौ. जयमाला जयवन्तराव भोसले यांच्या शुभहस्ते करण्यात आला.



भारतांतील शेतीव्यवसायाचा कायापालट...

भारतांतील शेती ही गेलीं हजारो वर्षे परंपरागत पद्धतीने केली जात होती; पण आतां या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हें या क्रांतीच्या प्रारंभाचें प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयिस्कर नांगर, पेरणी यंत्र, पाणी पुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्युगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिति करून किर्लोस्कर कारखान्यानें शेती व्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची गती दिली आहे.

किर्लोस्कर




किर्लोस्कर ब्रदर्स, लि.,
किर्लोस्करवाडी, जि. सांगली.



**जमखंडी अर्बन को. बँकेचे मार्केट यार्डमधील गोडाऊन**

१९६३–६४ साली हे बांधकाम पूर्ण झाले. आता त्यात नऊ छोटी मोठी गोडाउन्स, ऑफिसच्या खोल्या व इतर सोयी आहेत. (बँकेच्या कार्यालयातहि एक छोटेसे गोडाऊन आहे) ५,००० किलोग्रॅम एकाच वेळी वजन करता येईल, एवढ्या वजनाचा काटा तेथे बसविण्यात आला आहे. बँकेचे कार्यालय व गोडाउनची इमारत मिळून १,९३,००० रु. ची गुंतवणूक बँकेच्या नफ्याच्या काही अंशांचे प्रतीक म्हणून भक्कम उभी आहे.



### वैश्य को–ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई.

वैश्य को. बँकेची सभासद संख्या ३०–६–१९६५ अखेरच्या वर्षी १३९० ची १५२७ झाली आणि भाग भांडवल १,३२,७२० रु. वरून १,५८,००० रु. वर गेले. एकूण ठेवी ७,२८,८५१ रु. च्या ७,६४,७०८ रु. झाल्या. खेळते भांडवल ९,३१,८१६ रु. चे १०,७२,१७३ रु. झाले. वर्षारंभी महाराष्ट्र स्टेट को. बँक लि. कडे १,७५,००० रु. कायम ठेवीच्या रूपाने गुंतवले होते; आता ही गुंतवणूक ४,२५,००० रु. झाली आहे. कच्चे उत्पन्न १२,७३३ रु. नी वाढून ते ७४,५२७ रु. झाले. निव्वळ नफा गेल्या वर्षी ११,६७४ रु. होता तो अहवालाचे वर्षी २०,१७१ रु. झाला. बँकेचा स्थायी निधी आता ४४,१९१ रु. होईल. नफा-हिस्सा समतोल निधी ३,४३० रु., सरकारी कर्जरोखे घसारा निधी २५,९०० रु., संशयीत कर्जनिधी ९,०५० रु. असे इतर निधी झाले आहेत.

(अध्यक्ष : रामकृष्ण रामचंद्र टाकळे; उपाध्यक्ष : गजानन शंकर चिखले; सन्माननीय कार्यवाह : कमलाकर पुंडलीक बेर्डे; सन्माननीय सहकार्यवाह : महादेव वासुदेव शेट्ये; मॅनेजर : ना. शं. कानिटकर)

### रेडिओचा शेतकी–माहिती विभाग

भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्याने शेतीसंबंधी माहिती देण्यासाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचे ठरविले आहे. ह्या विभागातर्फे खेड्यांतील स्त्रियांना उपयुक्त ठरतील असे कार्यक्रमही प्रक्षेपित करण्यात येणार आहेत. विभागाचा प्रमुख म्हणून शेतीच्या व्यवसायाची चांगली माहिती असणारा एक प्रमुख संचालक नेमण्यात येईल. त्याला एका दुय्यम संचालकाची मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या कार्यक्रमासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल. १० घटक राज्यांत ह्या विभागाचे उपविभाग स्थापन करण्यात येतील. प्रथम पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, म्हैसूर, मद्रास आणि दिल्ली ह्या ठिकाणी उपविभाग स्थापन करण्यात येतील. रेडिओच्या सर्व केंद्रांवर अशा प्रकारचे विभाग हळूहळू उघडण्यात येतील


### अणुशस्त्रे बनविण्याची विनंती

लोकसभेच्या १०० सभासदांनी पंतप्रधान शास्त्री ह्यांना एक पत्र लिहून भारताने अणुशस्त्रे निर्माण करण्याचा निर्णय तातडतोब घ्यावा अशी विनंती केली आहे. ह्या सभासदांत सर्व पक्षांचे खासदार आहेत. पत्रात असे म्हटले आहे की, आक्रमणाविरुद्ध प्रतिकार करण्यास भारत असमर्थ ठरू नये असे जनतेचे प्रबळ मत आहे. तरीसुद्धा सरकारने अणुशस्त्रे बनवावयची नाहीत असा निर्णय घेतला आहे. भारत आक्रमणाविरुद्ध आणि लोकशाहीसाठी लढत असताना त्याच्या तथाकथित मित्रांनी शस्त्रास्त्रांची मदत करण्याचे नाकारलेले आहे. अशा परिस्थितीत देशाची सुरक्षितता ह्या मित्रांच्या लहरींवर अवलंबून ठेवणे धोक्याचे आहे, हे अलीकडील घटनांवरून स्पष्ट झालेले आहे.

---

**पकडलेल्या रणगाड्यांचे प्रदर्शन नको**—भारत–पाक संघर्षात पाकिस्तानने वापरलेला एक पॅटन रणगाडा दिल्लीत लोकांना दाखविण्यासाठी ठेवण्यात आला होता. काही दिवस लोकांनी तो पाहिला. पण नंतर तो तेथून अज्ञात स्थळी हलविण्यात आला. अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या रणगाड्यांपैकी भारतीय सैनिकांनी पाडाव केलेला तो एक रणगाडा होता.



## खताच्या आयातीला अग्रहक्क देणार

मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनी असे जाहीर केले आहे की, खताच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे शेतीच्या उत्पादनात घट होऊ दिली जाणार नाही. शेतीसाठी लागणारी रासायनिक खते आयात करण्यासाठी वाटेल तेवढे परदेशीय चलन मंजूर करण्याची सरकारची तयारी आहे. देशाची खताची गरज देशातील उत्पादनानेच भागविण्यासाठी अजून ५ वर्षे तरी लागतील. तोपर्यंत खताच्या आयातीस प्राधान्य देणे आवश्यकच आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात शेतीच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. लागवडीच्या शास्त्रीय पद्धती अमलात आणून भारतामधील शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन वाढवू शकतील. तसे झाल्यास चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचे अखेरीस अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण होऊ शकेल ह्याविषयी शंका घेण्याचे कारण नाही.

## परदेशांच्या पर्यटनांवर संपूर्ण निर्बंध

पाकिस्तानने भारतावर केलेल्या आक्रमणामुळे भारतामधून परदेशांत जाणाऱ्या सरकारी प्रतिनिधी मंडळांवर जवळ जवळ बंदी घालण्यात आली आहे. ह्या बाबतीत तसे लेखी हुकूम काढण्यात आलेले नसले तरी अर्थखाते अशा परदेशीय दौऱ्यांना परदेशीय चलन मंजूर करीत नाही. तथापि, ह्या धोरणालाहि काही अपवाद आहेत. संयुक्त संघटनेच्या बाबतीत भारताचे काही काम असेल तर त्या कामाला बंदीचा उपसर्ग लागू देण्यात येत नाही. त्याचप्रमाणे तांत्रिक अगर इतर जरूरीच्या अभ्यासासाठी परदेशांत जाण्याच्या बाबतीत ही बंधने आड येत नाहीत. निर्यात वाढविण्याचे प्रयत्न करण्यासाठी परदेशांत जाण्याची जरूरी भासली तरी अडथळे आणण्यात येत नाहीत. परिणामी खाजगी व्यक्तींना परदेशप्रवास करणे अतिशय अवघड झाले आहे. अर्थात एखाद्या व्यक्तीचा सर्व खर्च परदेशच करणार असेल, तर गोष्ट वेगळी.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७११००

बचतीच्या आकर्षक योजना

( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — ,, ३॥ ,,
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — ,, ५ ,,

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर



**सरदारगृह**

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.


— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :—३८३३७ ] सरदारगृह मा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
**" विजय " नांगर**
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



दातांच्या स्वच्छतेसाठी

**★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★**


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ४२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले